# दरपत्रक सुचना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत परभणी जिल्हयातील सन २०१६-१७ या अर्थिक वर्षाचे Statutory लेखापरिक्षण (Account Related management Service) सनदी लेखापाल मार्फत करण्यासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करावयाची असुन, त्यासाठी ई- दरपत्रक मागविण्यातयेत आहे. त्या बाबत किमान निकष, गुणांकनाची पध्दत, अटी व शर्ती अर्जासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे वित्त देकार या बाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट http:Mahatenders.gov.in या वेबसाईटवर (संकतेस्थळावर) Online पध्दतीने दि. / / २०१७ (वार) सकाळी ११.०० वाजेपासून दि. / /२०१७ (वार) दुपारी ४.०० वाजे पर्यंत सुटीचे दिवस वगळता उपलब्ध्द असेल या कालीवधीत इच्छुक वैधानीक लेखापालांनी ऑनलाईन अर्ज सादर करावेत. ऑनलाईन अर्ज सादर करावयाची मुदत वरील प्रमाणे असून ई-दरपत्रक हया दिनांक / /२०१७ रोजी दुपारी ५.०० वाजता किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्या वेळेसगठीत केलेली समिती व संबंधित दरपत्रक धारकासमोर उघडण्यात येतील.

दरपत्रक शुल्क न भरलेल्या तसेच सविस्तर माहिती भरणा न केलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रक धारकाने दरपत्रक ऑनलाईन / ईलेक्ट्रानिक पध्दतीने सादर करावयात दरपत्रक संबंधिच्या पुढील सुचना / शुध्दीपत्रके इंटरनेटच्या उपयोगाने ऑनलाईन भरण्यात येतील. दरपत्रीकेच्या अटी व शर्ती किमान निकश, सुचना व इतर आवश्यक माहिती सोबत जोडली असून सदरील दरपत्रक किंवा दरपत्रीकेचा कोणताही भाग, यामध्ये कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्याचा / नाकारण्याचा / स्विकारण्याचा / राखुन ठेवण्याचा हक्क जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) परभणी यांनी राखुन ठेवला आहे. दरपत्रक खर्चाची विक्री स्विकृती ही सदर वेबसाईटवरुन फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असुन सर्व दरपत्रक दोन पाकीट पध्दतीने मागविण्यात येत आहे.

सदरील दरपत्रके संदर्भात कोणताही न्यायालयीन खटला उदभवल्यास तो परभणी जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात चालविल्या जाईल. कोणत्याही स्पष्टीकरण करीता दरपत्रक धारकाने ई - दरपत्रक संबंधीत अधिक माहितीसाठी रोजगार हमी योजना विभाग जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांचे E-mail ID: egsdycoll.par-mh@gov.in व दुरध्वनी क्र. 02452 -.233 383 वर संपर्क साधावा.

ठिकाण : परभणी.
दिनांक : /०६/२०१७

जिल्हाधिकारी तथा
जिल्हा कार्यक्रम समन्वयक
मग्रारोहयो, परभणी